# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. २०७/२००८/ दिनांक :

१) श्री. भानुदास महादेव लाटणे, अर्जदार
यशवंतनगर, लेंगरे रोड, विटा, जि. सागली

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,
म.रा.वि.वितरण कं.लि., संवसु मंडळ कार्यालय,
विश्रामबाग , सांगली. विरूध्द पक्षकार

२) कार्यकारी अभियंता,
म.रा.वि.वि.कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, विटा, जि. सांगली

२) सहाय्यक अभियंता,
महावितरण, उप विभाग २, विटा, जि. सांगली.

**कोरम** :– १) श्री. के.वाय. जगताप, अध्यक्ष
२) श्री. एस.आर. बांबळे, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्यायनिर्णय

श्री. के.वाय. जगताप, अध्यक्ष,ग्रा.त.नि.मंच यांचेतर्फे दिनांक ०३.०२.२००९

सदरचे अपील अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडील ता. ३१.७.२००८ चे अर्जावर झालेल्या आदेशाविरुध्द दाखल करण्यात आलेले आहे. अर्जदाराने क्ष नमुन्यामध्ये दि. २०.६.२००८ रोजी अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्षाकडे यंत्रमाग संजीवनी योजनेचा लाभ त्यांना संबंधित बिलामध्ये मिळत नसल्याने व असे असूनही त्यांचेकडून बिलांची वसुली करुन घेतली असल्याने, त्यांना यंत्रमाग संजीवनी योजनेचा लाभ मिळावा या बाबत विनंती केलेली होती.

सदरील अपिलामध्ये वि.प.स नोटीस काढल्यावरुन वि.प.तर्फे म्हणणे देण्यात आले. त्याप्रमाणे सदरचे प्रकरण दिवाणी कोर्टात न्यायप्रविष्ट असलेने व त्या संबंधातील दिवाणी दावा क्र. २१/२००७ दिवाणी कोर्टात चालू असल्याने या मंचास अपिलाबाबतचे अधिकार नाहीत. परंतु असे असतांनाही, वि.प.तर्फे वरील अर्जदारास ग्राहकाचे सन २००० पासून पुढे ऑगस्ट २००८ पर्यंतचे बी–८० प्रमाणे हिशोब पत्रक दाखल केलेले आहे. सदरील हिशोब पत्रकाप्रमाणे अर्जदार हे मार्च २००४ रोजी रु. १२२९१.९३ एवढ्या रकमेचे थकबाकीदार होते व पुढे त्यांनी मार्च २००५ अखेर थकबाकीपैंकी ५०% व पुढे होणाऱ्या बिलाची सर्व रक्कम असे एकूण रु. ५२७१४/– भरलेले आहेत. सबब त्यांना मार्च २००४ चे थकबाकीवर ५०% म्हणजे रु. ६१४५.९६ एवढ्या रकमेचा यंत्रमाग संजीवनी योजनेचा लाभ देण्यात आलेला आहे.

पुढे सदरील अपीलार्थीने दिवाणी कोर्ट, विटामध्ये दाखल असलेला दावा क्र २१/२००७ हा काढून घेतला आहे. या प्रकरणामध्ये पुरशीस दाखल केली. परिणामी, सदरील अर्जदाराचे प्रकरण या मंचास चालविणेचा अधिकार प्राप्त झाला. वि.प.तर्फे दाखल केलेल्या हिशोब पत्रकामध्ये ऑगस्ट २००८ अखेरच्या बिलाबाबत हिशोब दिलेला आहे व त्याप्रमाणे सदरील अपीलार्थीने वेळोवेळी भरलेली रक्कम विचारांत घेता, अर्जदाराकडे मार्च २००४ रोजी येणे रक्कम रु.२५०११.९३ एवढी होती. त्यानंतर यंत्रमाग संजीवनी योजने प्रमाणे अशा थकबाकीपैंकी ५०% रक्कम व चालू बिलाची संपूर्ण रक्कम अशी मार्च २००५ अखेर जर ग्राहकाने भरली तर यंत्रमाग संजीवनी योजने प्रमाणे मार्च २००४ च्या येणे रकमेपैंकी ५०% सूट मिळणार होती. त्याप्रमाणे वि.प.तर्फे दाखल केलेल्या हिशोब पत्रकाचा विचार करता, मार्च २००५ अखेर येणे असलेली एकूण रक्कम रु. ४१२२४.९६ व मार्च २००५ अखेर ग्राहकाने भरलेली रक्कम रु. ५२७१४.०० अशी आहे. सबब सदरच्या ग्राहकाचे मार्च २००५ रोजी वि.प.कडे जादा रक्कम भरल्याची नोंद आहे. पुढे ही जादा रक्कम वि.प.तर्फे पुढील येणे रकमेच्या बाकीमध्ये समायोजित केलेली आहे. ऑगस्ट २००८ मध्ये सदर ग्राहकाची वि.प.कडे रक्कम
रु. ९३२०.६६ एवढी जादा रक्कम जमा आहे.

सदरील हिशोब पत्रक हे वि.प.तर्फे दाखल केले असले तरी ते अर्जदार व वि.प. अशा दोन्ही पक्षकारांना मान्य आहे. परिणामी, अर्जदाराचा अर्ज निकाला काढता येऊ शकतो. सबब खालील मुद्दे आमच्या विचारार्थ उदभवतात.

१) मार्च २००४ अखेर येणे रकमेमध्ये यंत्रमाग संजीवनी योजने प्रमाणे सदरील ग्राहकास ५०% रकमेचा लाभ मिळण्याचा हक्क आहे काय ?

उत्तर : होय

२) सदरील ग्राहकाची मार्च २००५ रोजी त्यांचेकडील येणे रक्कम वसूल होता किती रक्कम बाकी रहाते ?

उत्तर : ग्राहकाने मार्च २००५ अखेर रु. ११,४८९.०४ एवढी जादा रक्कम भरलेली आहे.

३) ऑगस्ट २००८ अखेर ग्राहकाची वि.प.कडे किती रक्कम जमा आहे. ?

उत्तर : रु. ९३२०.६६ एवढी जास्तीची रक्कम वि.प.कडे जमा आहे.

४) आदेश ?

उत्तर : अखेरच्या आदेशा प्रमाणे.

कारणमिमांसा

सदरील प्रकरणामध्ये वर सुरुवातीस नोंदविल्याप्रमाणे वि.प.ने एप्रिल २००० पासून पुढे ऑगस्ट २००८ पर्यंत हिशोब पत्रक दाखल केले आहे. सदरचे हिशोब पत्रक हे बी–८० प्रमाणे सी.पी.एल. च्या नोंदीवरुन तक्रार केली आहे. या हिशोब पत्रकामध्ये अर्जदारास सरकारच्या सवलतीप्रमाणे येणाऱ्या विजेची बिले सवलतीच्या दराने तयार केलेली आहेत. सबब जरी सीपीएलच्या नोंदीप्रमाणे संबंधित त्या त्या वेळी जादा रकमा ( एमईआरसीच्या टॅरिफप्रमाणे) दिल्या असल्यातरी सरकारी सवलती प्रमाणे अशा रकमा कमी झालेल्या आहेत. त्या रकमा बी–८० च्या हिशोबा प्रमाणे दुरुस्त केलेल्या आहेत. परिणामी, मार्च २००५ अखेर ग्राहकाची जी रक्कम जमा झाली आहे, ती रक्कम त्याच्याकडील येणे रकमेपेक्षा जास्त आहे. सबब यंत्रमाग संजीवनी योजने प्रमाणे ग्राहकास मार्च २००४ च्या येणे रकमेवर वि.प.ने ५०% सूट दिलेली आहे. पुढे मार्च २००५ अखेरची ग्राहकाची जास्तीची रक्कम जमा दिसते. त्याचे समायोजन पुढील बिलामध्ये केलेले आहे व पुढे ऑगस्ट २००८ रोजी ग्राहकाने भरलेल्या येणे रकमेचा विचार करता, ग्राहकाची वि.प.कडे रु. ९३२०.६६ जास्तीची रक्कम जमा आहे. अशी जास्तीची जमा रक्कम ही ग्राहकास वि.प.ने ऑगस्ट २००८ च्या नंतर येणाऱ्या बिलामध्ये समायोजित करणेची आहे. परिणामी, वरील मुद्दा क्र. १ ते ३ कडे आम्ही आमचे निष्कर्ष नोंदवित आहे. सबब अर्जदाराचा तक्रार अर्ज मान्य करुन त्यास यंत्रमाग संजीवनी योजनेचा लाभ दिला आहे असे जाहीर करणे क्रमप्राप्त ठरते, सबब आदेश.

## **आदेश**

१) अर्जदाराचा अर्ज मान्य करण्यात येत आहे. त्यास मार्च २००४ चे येणे रकमेवर यंत्रमाग संजीवनी योजने प्रमाणे ५०% सूट देण्यात आलेली आहे.

२) अर्जदार यांचे बी–८० च्या हिशोब पत्रकाप्रमाणे ऑगस्ट २००८ मध्ये वि.प.कडे रु. ९३२०.६६ एवढी जास्तीची रक्कम जमा आहे. सदरची रक्कम वि.प.ने अर्जदाराच्या पुढील येण्यामध्ये समायोजित करणेची आहे.

३) खर्चाबाबत आदेश नाही.

४) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

( काकासाहेब य . जगताप )
अध्यक्ष,
ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर

दिनांक : ०३.०२.२००९

श्री. जी.सी लेले, ग्राहक सदस्य ..

श्री. एस.आर. बांबळे, सदस्य सचिव ..

ग्राहक तक्रार निवारण मंच कोल्हापूर परिमंडळ यांजकडे विटा, जि. सांगली येथील दाखल तक्रार प्रकरण क्र. २०७ ते २२५ पैंकी क्र. २२१/०८ श्री. भानुदास महादेव लाटणे बाबत सदस्य सचिव खालील प्रमाणे म्हणणे मांडित आहेत.

विटा, जि. सांगली येथील १९ यंत्रमाग वीज ग्राहक यांनी यंत्रमाग संजीवनी योजनेचालाभ मिळाला नाही व वि.प.कडून देण्यात आलेले वीज बिलात लावलेली थकबाकी रकमा फुगविलेल्या पोकळ व चुकीच्या आहेत सदर बील दुरुस्त करुन मिळावे. तसेच सदर लाभ मिळणे करीता मा. दिवाणी न्यायालयाकडे एकत्रित गटाने दावा दाखल केला आहे व कंपनीकडून वीज पुरवठा बंद करणेची नोटीस देणेत आली. वितरण कंपनीकडे वीज बिलाचा योग्य हिशोब करुन बील देण्यास मागणी करणेत आली. त्यास दाद देणेत आली नाही. या बाबत यंत्रमाग संजीवनी योजनेचा लाभ मिळाल्यास न्यायालयातून दावा काढून घेणार असलेचे कळविले. या बाबत अंतर्गत कक्षाकडे दि. २०.६.२००८ रोजी तक्रार दाखल करण्यात आली. त्यानुसार कक्षाने आदेश पत्र क्र. ६३६५ दि. ३१.७.२००८ ने निकाल दिला आहे. सदर निकाल मान्य न झालेमुळे अर्जदाराने मंचाकडे दि. २५.८.२००८ रोजी अपील दाखल केले आहे. त्यानुसार मंचाने कारवाई अंतर्गत संबंधित वि.प.चे अधिकाऱ्याकडून मुद्देनिहाय माहिती मागविली व सुनावणी करीता दि. १.१२.२००८ ठिकाण सांगली तारीख ठरविण्यात आली. दि. १.१२.२००८, ५.१.२००९ च २९.१.२००९ रोजी सुनावणीवेळी तक्रारदार प्रतिनिधी श्री. जावेद मोमीन व वि.प.तर्फे सहाय्यक अभियंता व सहाय्यक लेखापाल, विटा उप विभाग इ. हजर होते.

तक्रारदार यांनी खालील प्रमाणे बाजू मांडली

विटा येथील त्यांचे यंत्रमाग वीज जोडणीस यंत्रमाग संजीवनी योजनेचा लाभ मिळावा, वि.प.कडून सदर जोडणी वरील वीज बिलात फुगविलेल्या पोकळ व चुकीच्या रकमा लावण्यात आल्या आहेत. वि.प.च्या संबंधित कार्यालयाकडे विनंत्या करुनही प्रतिसाद मिळाला नाही व दरम्यान वीज पुरवठा खंडित करण्याची नोटीस देण्यात आल्या. या प्रकरणी न्याय मिळावा म्हणून दिवाणी न्यायालयात केस दाखल केली आहे. वि.प.कडून बील दुरुस्ती करुन यंत्रमाग संजीवनीचा लाभ देण्याची हमी/ आश्वासन दिलेस मा.न्यायालयातील दावा काढून घेणार आहे.

या बाबत वितरण कंपनीचे म्हणणे खालील प्रमाणे ___

तक्रारदार यांनी न्यायालयात दावा दाखल केलेला असलेमुळे, न्यायप्रविष्ट असलेमुळे त्यावर वीज पुरवठा तोडण्याबाबत कोणतीही कारवाई करणेत आलेली नाही. तक्रारदार यांचे हिशोब तपासून योग्य बील व यंत्रमाग संजीवनीचा लाभ देण्यास शासकीय परिपत्रकाचे अटीप्रमाणे ग्राहक पात्र असलेस लाभ देणेत येईल असे सांगितले.

सदस्य सचिव यांचे मत

ग्राहकाने वि.प.कडून वीज बील दुरुस्ती करुन देणार व यंत्रमाग संजीवनी योजनेचा लाभ मिळणेस पात्र असलेस लाभ देणेत येईल असे आश्वासन मिळाले असलेमुळे न्यायालयात केलेला दावा मागे घेणार असलेचे सांगितले. त्यानुसार वि.प. व तक्रारदार यांनी वीज बिलाचा निश्चित हिशोब तपासून मुद्दा सोडविणेत यावा.

यंत्रमाग संजीवनी योजनेस पात्र होणे करीता शासन निर्णय व मराविमं विभागीय परिपत्रक (वाणिज्य) ७१२ दि. २१.७.२००४ व क्र. ७२८ दि. ११.१.२००५ यंत्रमाग ग्राहकास वीज बिलात सवलती करीता लागू करणेत आले होते. त्या करीता खालील अटींची पूर्तता करणे होते.

दिनांक ३१ मार्च २००४ पर्यत यंत्रमागधारकांचे एकूण थकबाकी रकमेपैंकी ५०%निम्मी रक्कम ग्राहकाने ३१ मार्च २००५ पर्यंत भरणे आवश्यक होते. त्या सोबत एप्रिल २००४ ते फेब्रुवारी २००५ कालावधीचे चालू बिले भरणे आवश्यक होते तरच दि. ३१.३.२००४ रोजी असलेल्या मूळ थकबाकी रकमेच्या ५०% रक्कम व

दंड व्याज रकमेत सवलत मिळणार होती. म्हणून ज्या तक्रारदारांकडून वरील अटींचे पालन झाले नाही ते यंत्रमागधारक संजीवनी योजनेस पात्र ठरले नाहीत.



तसेच एप्रिल २००० पूर्वीची देय असणारी थकबाकी त्यास कोणतीही सवलत नसलेने भरणे बंधनकारक आहे. तसेच १ मे २००० पासून जून २००८ वेळोवेळी शासनाने दिलेल्या सवलतीचे भरणा न केलेल्या वीज बिलाची थकबाकी तक्रारदार ग्राहकांकडे राहिली नाही. त्यामुळे तक्रारदारांच्या म्हणण्याप्रमाणे न भरलेल्या रकमांची पोकळ थकबाकी रकमा म्हणून दाखविले नाही.

या बाबत यंत्रमाग योजनेचा लाभ घेण्यास तक्रारदार ग्राहकांपैंकी पात्र ठरलेल्या खालील तक्रारदारांनी थकबाकी व भरलेल्या इतर रकमांचा तपशील खाली नमूद केलेप्रमाणे दिसून आला. मार्च २००४ पूर्वीच्या त्या त्या कालावधीची वीज बिले शासकीय परिपत्रकानुसार ठरलेल्या प्रतिमहा दराप्रमाणे व प्रति युनिट दराप्रमाणे वितरण कंपनीतर्फे काढणेत आली आहेत. त्या रक मा वितण कंपनीकडून लेखा परीक्षित करण्यत आलेल्या आहेत व तो हिशोब थेट प्रति यंत्रमाग/ युनिट प्रमाणे आकारलेला असलेमुळे स्पष्ट व उघड आहे, त्यात दूमत असण्याचे कारण नाही. तसेच ग्राहकाने यंत्रमाग योजनेचा लाभ २००४ सालात जाहीर केला असतांना ग्राहकाने इतक्या उशिरा सुमारे ४ वर्षे उलटून गेल्यानंतर त्याचा दावा करणे संयुक्तिक व ग्राह्य वाटत नाही, लाभ मिळण्याचा दावा केल्याचे कारण स्पष्ट होत नाही.

| अ.क्र. | तक्रारदार लाभार्थींचे नांव सर्वश्री | के स क्रमांक | लाभ रक्कम ५०% मार्च २००४ अखेर | येणे रक्कम एप्रिल २००४ ते मार्च ०५ अखेर | एकूण | प्रत्यक्षा भरलेली रक्कम | यंत्रमाग संजीवनी योजनेस पात्रता |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | भानुदास महादेव लाटणे | २०७ | ६१४५.९६ | ३५०७९.०० | ४१२२४.९६ | ५२७१४.०० | पात्र |

ग्राहकाचे वैंयक्तिक लेखा खाते सीपीएल मधील नोंदी व प्रत्यक्ष वीज देयकाची रक्कम यात दिसत असलेल्या तफावती बाबत वि.प.कडून म्हणणे मांडले गेले की, मार्च २००४ पर्यंतची वीज बिले वितरण कंपनीने विद्युत नियामक आयोगाच्या दराने काढण्यात आली होती. परंतु दरम्यान शासनाचा यंत्रमाग संजीवनी योजनेअंतर्गत सवलतीचा वीज दर लागू झाल्याने सीपीएल व प्रत्यक्ष बील यातील रकमांमध्ये फरक दिसत होता. म्हणून शासन सवलतीच्या दराने सीपीएलवर वीज देयकाचा तपशिल उींरविणे करिता वि.प.कडून संगणकावर बी–८० प्रस्ताव भरुन जुलैं २००४ च्या पुढे दुरुस्त केलेल्या रकमांनुसार वीज देयके सुरळीत देण्यात येत आहेत. अशाप्रकारे थकबाकी रक्कम फुगलेल्या चुकीच्या असल्याच्याय तक्रारदार ग्राहकाचे मुद्‌द्यांचे वि.प.कडून खंडन करणेत आले.

वरील तक्त्यात नमूद केलेल्या तक्रारदाराचे देय बील रकमा, भरलेल्या रकमा यांचा वि.प.कडून प्राप्त झालेला अहवाल व ग्राहकांनी एप्रिल २००४ ते फेब्रुवारी २००५ भरलेल्या रकमांचे अवलोकन केले असता, वरील तक्रारदार ग्राहक शासकीय परिपत्रकास अनुसरुन यंत्रमाग संजीवनी योजनेचा लाभ मिळण्यात पात्र आहेत.

ग्राहक व वि.प.कडून मांडण्यात आलेले मुद्दे, कागदपत्रें, जबाब इ. विचारात घेवून सदस्य सचिव यांचेकडून वरील प्रमाणे म्हणणे / मत देणेत येत आहे.

( एस. आर. बांबळे )

सदस्य सचिव, ग्रा.त.नि.मंच,
कोल्हापूर

या बाबत तक्रारदाराच्या थकबाकी व भरलेल्या रकमांचा तपशील खाली नमूद केलेप्रमाणे दिसून आल्या.

| अ.क्र. | तक्रारदार लाभार्थींचे नांव सर्वश्री | केस क्रमांक | लाभ रक्कम ५०% मार्च २००४ अखेर | येणे रक्कम एप्रिल २००४ ते मार्च ०५ अखेर | एकूण | प्रत्यक्षा भरलेली रक्कम | यंत्रमाग संजीवनी योजनेस पात्रता |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | भानुदास महादेव लाटणे | २०७ | ६१४५.९६ | ३५०७९.०० | ४१२२४.९६ | ५२७१४.०० | पात्र |



या बाबत ग्राहकाचे वैंयक्तिक लेखा खाते मधील नोंदी/ तफावत विचारात घेता वि.प.कडून म्हणणे मांडले गेले. मार्च २००४ पर्यंत बिले वितरण कंपनीचे नियमित दराने काढण्यात आली. परंतु दरम्यान महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने ठरविलेले दर लागू करणे ठरल्याने संगणकावर त्याचा मेळ घालून जुलैं २००४ मध्ये परिणाम देणेत आला. परंतु अशा काही प्रकरणामध्ये जमा रक्कम असणाऱ्या प्रकरणात सदृष्य परिणाम दिसणे करीता वि.प. ने दुरुस्ती पत्रक बी –८० संगणकास भरणेत येवून बिलाची रक्कम निश्चित केलेचे सांगणेत आले. त्यामुळे रकमा फुगलेल्या / चुकीच्या असलेल्या तक्रारदारांच्या मुद्द्यांचे खंडन वि.प.कडून करणेत आले.

वरील तक्त्यात नमूद केलेल्या तक्रारदाराचे देय बील रकमा व भरलेल्या रकमा याचा वि.प.कडून प्राप्त झालेला तपशिल अवलोकन केले असता –

१) २०७/०८ – श्री. भानुदास महादेव लाटणे
२)
हे ग्राहक यंत्रमाग संजीवनी शासकीय परिपत्रकास अनुसरुन पात्र आहेत.

या प्रमाणे सदस्य सचिव यांचे मत या ठिकाणी संपविणेत आले.